ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal
A Peer Reviewed Referred Journal

OPEN ACCESS

Volume–IX, Issues–II
March – April 2022

Original Research Article

# भारतातील संस्थानांचे स्वतंत्र भारतात विलनीकरण व त्यानंतरची परिस्थिती : एक अवलोकन

*डॉ. शितल मनोज पंचीकर*

*सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, इस्माईल युसूफ महाविद्यालय,*मुंबई महाराष्ट्र

**प्रस्तावना:**

संस्थानांच्या विलनीकरणासंदर्भात ब्रिटिश सरकारने १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी भारतीय संस्थानांनी भारतात किंवा पाकिस्तानमध्ये सामील व्हावे. स्वातंत्र्यानंतर कोणतेही संस्थान एकाकी राहू शकणार नाही असे जाहीर केले. परंतु येथेही ब्रिटीश सरकारने फोडा व झोडा या राजकारणाचा उपयोग करत हैद्राबादच्या निजामाला आणि इतर संस्थानिकांना त्यांची संस्थाने स्वतंत्र ठेवण्याच्या स्वप्नाला उत्तेजन दिले. यामुळेच भोपाळ, इंदौर, धोलपूर, जोधपूरसारख्या संस्थानांनी आपली संस्थाने स्वतंत्र कशी राहतील यासाठी खटपटी करण्यास सुरुवात केली. तर बडोदा संस्थानाने भारतात विलीन होण्याची घोषणा केली.

स्वातंत्र्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांनी घेतलेल्या खंबीर भुमिकेमुळे जुनागढ, हैद्राबाद आणि काश्मीर वगळता इतर संस्थानांचे भारतात विलनीकरण झाले. पुढील टप्प्यात संस्थानांचे एकीकरण, लोकशाहीकरण आणि आधुनिकीकरण व्हायचे होते. एकीकरणाच्या टप्प्यात २६६ लहान मोठी संस्थाने शेजारील प्रांतात विलीन करण्यात आली. तर काही संस्थानांचा प्रदेश केंद्रशासित म्हणून जाहीर करण्यात आला. त्यानंतर काही संस्थानांचे संघ तयार करण्यात आले. पुढे भाषावार प्रांतरचनेमध्ये संस्थाने त्या त्या प्रांतात विलीन करण्यात आली. याद्वारे त्यांचे अस्तित्व पूर्णपणे नष्ट झालेले आढळते.

स्वातंत्र्यानंतर देखभालीचा खर्च परवडत नसल्यामुळे बऱ्याच संस्थानिकांनी त्यांचे महाल, घरे, दागदागिने, गाडया, विमाने सरकारला देऊन टाकले. तर मोठया संस्थानांनी आपला पैसा संशोधन संस्था, शिक्षण, आरोग्य, समाजसेवा, उद्योग यामध्ये गुंतवला. बऱ्यास संस्थानिकांनी राजकारणात प्रवेश करुन महत्वाची पदे भूषवलेली आढळतात. डिसेंबर १९७२ मध्ये कॉंग्रेस सरकारने संस्थानांना मिळत असलेला विशेष दर्जा व अधिकार रद्द केले. या बाबतीतही संस्थानिकांनी विरोध केलेला आढळून येतो.

अशाप्रकारे संस्थानांचे स्वतंत्र भारतात विलनीकरण, विलनीकरणानंतरही संस्थानिकांनी त्यांच्या प्रजेसाठी केलेले कार्य, राजकारणात भाग घेऊन केलेले नेतृत्व, तत्कालिन घडामोडींबाबत घेतलेली भूमिका या सर्व परिस्थितीचा अभ्यास सदर शोधनिबंधात करण्यात आलेला आहे.

५०० च्या वर असलेल्या संस्थानांचा विलनीकरणाचा प्रश्न फाळणी इतकाच महत्वाचा होता. संस्थानिकांनी तत्कालीन परिस्थिती ओळखून तसेच देशाचा आणि प्रजेचा विचार करुन संस्थानांचे भारतात विलनीकरण करुन लोकशाहीला

प्राधान्य दिल्याचे आढळून येते. स्वातंत्र्यानंतरही बऱ्याच संस्थानिकांनी उद्योग, समाजकारण, राजकारण यामध्ये भाग घेऊन आपली प्रतिष्ठा आजपावेतो जपलेली दिसून येते.

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

## संस्थानाचे विलीनीकरण प्रक्रिया

भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी भारताचा ४८ % प्रदेश हा संस्थानांनी व्यापलेला होतो ज्याची लोकसंख्या २८% होती. स्वातंत्र्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल व व्ही.पी. मेनन यांच्या प्रयत्नांमुळे ५६२ संस्थाने स्वतंत्र भारतात विलीन झाली. इंग्लंडचे पंतप्रधान ॲटली यांनी संस्थानांच्या स्थितीबाबत भाष्य करताना सांगितले की, भारतीय संस्थाने इंग्लंडच्या अधिपत्याखाली असतांना भारत देशाचाच भाग होती. भारताशिवाय एक वेगळी अशी आंतरराष्ट्रीय मान्यता त्यांना नव्हती. त्यामुळे संस्थाने जर स्वतंत्र भारतापासून वेगळी राहिली तर दुर्भाग्यपूर्ण असेल.यावरुन भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संस्थानिकांशी ब्रिटिश सत्तेने केलेले करारमदार रद्द केले जातील व संस्थानांना आपला निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले जाईल अशी भूमिका घेऊन संस्थानांनी स्वंतत्र भारतात विलीन होणे त्यांच्या हिताचे असल्याचे ब्रिटिश सरकारने स्पष्ट केलेले दिसते. असे असले तरी भारताला स्वातंत्र्य देणे ब्रिटिश अधिकाऱ्यांना जड जात होते. त्यामुळे त्यात कसे अडथळे येतील यासाठी त्यांनी जाणूनबुजून प्रयत्न केले. लॉर्ड व्हेवल यांच्या काळातच संस्थानांशी संबंधित ४ टन कागदपत्रे जाळण्यात आली. तर इतर काही बरीच कागदपत्रे लंडनच्या पुराभिलेखागारात पाठविण्यात आली.

पोलिटिकल डिपार्टमेंटमधील कॉरफिल्डसारखे ब्रिटिश अधिकारी हे आतून निजामाला मदत करीत होते. सरदार पटेलांनी जेव्हा संस्थानी विभागाचा चार्ज घेतला तेव्हा कॉरफिल्ड यांचेकडून निजामासंदर्भात कागदपत्रे मिळवण्यास त्यांना अतिशय त्रास झाला.अशाप्रकारे ब्रिटिश अधिकाऱ्यांकडून उत्तेजन मिळाल्यामुळे बऱ्याच संस्थानिकांनी स्वतंत्र राहण्याची इच्छा व्यक्ती केली. येथे ब्रिटिश सरकारने फोडा व झोडा या त्यांच्या परंपरागत राजकारणाचा शेवटपर्यंत उपयोग केलेला दिसून येतो.

**संस्थानिकांची विलीनीकरणासंदर्भात प्रतिक्रिया:-** ४ जून १९४७ रोजी भोपाळच्या नवाबांनी आपले संस्थान स्वतंत्र राहिल असे जाहीर केले. भोपाळचे नवाब हमीदहुल्लाखान यांनी संस्थानिकांमध्ये फूट पाडून स्वतंत्र भारतविरोधी एक तिसरी शक्ती निर्माण करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले, सरतेशेवटी त्यांनी अत्यंत गुप्तपणे विलीनीकरणाच्या करारावर सह्याा केल्या.पूर्वजांनी प्रस्थापित केलेले राज्य सोडून देण्यास संस्थानिक सहजासहजी तयार नव्हते हेच भोपाळच्या नवाबांच्या विरोधावरुन दिसून येते.

इंदौरचे संस्थानिक यशवंतराव होळकर यांनी २८ मे १९४२ रोजी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष फ्रॅकलिन डी रुझवेल्ट यांना पत्र लिहिले व भारतीय संस्थानांच्या प्रश्नासंदर्भात हस्तक्षेप करण्यास सांगितले. ही गोष्ट ब्रिटिश सरकारला आवडली नाही. सरते शेवटी स्वतंत्र भारतात विलीनीकरणाची कागदपत्रे सही करुन त्यांनी साध्या पोस्टाने दिल्लीला पाठवून

दिली.

नेहरुंनी जाहीर केलेल्या, 'जे संस्थानिक विलीनीकरणाच्या करारावर सही करणार नाहीत त्यांना भारतविरोधी मानण्यात येईल' यास धोलपूरच्या संस्थानिकांचा विरोध होता. लॉर्ड माऊंटबॅटन यांना भेटून धोलपूरच्या महाराजांनी ब्रिटिशांनी भारत सोडून जाण्याचा निर्णय सोडून द्यावा अशी विनंती केली. अखेर अत्यंत अश्रूपूर्ण नयनांनी त्यांनी विलीनीकरणाच्या करारावर सह्याा केल्या.

बॅ.जीना यांनी याकाळात पंजाब व बंगाल प्रांतातील संस्थानिकांना आपल्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न केला. पटियालाच्या महाराजांनी बॅ.जीनांना नकार कळविला जोधपूरचे महाराज हनवंतसिंग यांना स्वत:चे राज्य स्वतंत्र ठेवण्याची इच्छा होती. त्यासाठी जेव्हा त्यांनी बॅ.जीनांची भेट घेतली तेव्हा तुमच्या सर्व अटी मान्य करु. तुम्ही फक्त पाकिस्तानात सामील व्हा' असे ते म्हणाले. जोधपूर संस्थानामध्ये मात्र या भेटी विरुध्द असंतोष पसरला तेव्हा जोधपूरच्या महाराजांनी ही योजना सोडून दिली आणि भारतात सामील होण्याचा निर्णय घेतला.भारताला स्वातंत्र्य मिळण्याबरोबरच झालेल्या फाळणीमुळे विलीनीकरणाबाबत किंवा संस्थान स्वतंत्र ठेवणेबाबत संस्थानिकांच्या मनात गोंधळ निर्माण झालेला आढळतो.

जुनागढचे नवाब, हैद्राबादचा निजाम, त्रावणकोरचे राजे यांनी आपले संस्थान स्वतंत्र राहील असे जाहीर केले. ब्रिटिश सत्तेच्या काळात भारतातील सर्व संस्थानिकांना कोणत्याही जबाबदारी शिवाय सत्ता उपभोगण्यास मिळाली. त्यामुळे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारकडूनही पूर्वीप्रमाणेच आपले हक्क, अधिकार प्रतिष्ठा सांभाळली जावी असे त्यांचे म्हणणे होते. दुसऱ्या महायुद्ध काळात काही संस्थानिकांनी आपले सैन्य वाढविले असल्यामुळे प्रसंगी भारताविरोधी या सैन्यदलाचा वापर करण्यास संस्थानिक तयार होते. बिलासपूरसारख्या ५०० चौ.मैल प्रदेश असणाऱ्या संस्थानच्या महाराजांनी आक्रमकपणे असे जाहीर केले होते की, 'गरज पडली तर आम्ही आमच्या संस्थानाच्या संरक्षणासाठी लढण्यासही तयार आहोत.त्यामुळेच बऱ्याच जाणकारांना फाळणीच्या प्रश्नापेक्षा संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्न अवघड व महत्त्वाचा वाटत होता.

**संस्थानांचे विलीनीकरण**

भारतील राष्ट्रीय कॉंग्रेस मधील महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु यांच्यासारख्या नेत्यांची संस्थानांचे भारतातच एकीकरण व्हावे अशी भूमिका होती. ही जबाबदारी २७ जून १९४७ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांना संस्थांनी विभागाचे मंत्री व व्ही.पी. मेनन यांना सेक्रेटरी बनवून देण्यात आली. सरदार पटेलांच्या मुत्सद्देगिरी, सावधानता, खंबीरपणा व संस्थानिकांमध्ये निर्माण केलेला विश्वास त्यामुळे १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी जुनागढ, हैद्राबाद आणि काश्मिर यांचा अपवाद वगळता १३६ संस्थाने भारतात सामील झाली होती. बडोदयाच्या महाराजांनी विलीनीकरणाच्या करारावर सर्वप्रथम सही केली.यावरुन संस्थानिकांनी देशहिताचा केलेला विचार विशेष महत्त्वाचा ठरतो.

मुंबई प्रांतातील संस्थाने दोन गटात विभागलेली होती. पहिले बडोदा, गुजरात मधील संस्थाने आणि दक्षिणेतील महाराष्ट्रातील संस्थाने. मुंबई प्रांतातील दख्खन प्रदेशाचा विचार करता येथे कोल्हापूर धरुन एकूण १७ संस्थाने होती. १९ फेब्रुवारी १९४८ रोजी दख्खन संस्थानिक संघाची बैठक, बी.जी.खेर (मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री) यांच्या अध्यक्षतेखाली

मुंबई येथे घेण्यात आली. बैठकीत संस्थानिकांना दिला जाणारा विशेष दर्जा, खास अधिकार (Privy Purse) संबंधी चर्चा होऊन बैठकीला उपस्थित १४ संस्थानिकांनी विलीनीकरणाच्या करारावर सह्याा केल्या.मुंबई प्रांतातील संस्थानाचे विलीनीकरण शांततेच्या मार्गाने पार पडलेले दिसून येते. ८ मार्च १९४८ रोजी महाराष्ट्रातील संस्थानांचे विलीनीकरण अंमलात आणले गेले. या विलीनीकरणाद्वारे ७,८१५ चौ.मैलाचा प्रदेश व १९,९३,१०३ लोकसंख्या असलेला प्रदेश मुंबई प्रांतात सामील झाला.यानंतर सुरत व नाशिक जिल्ह्याच्या दरम्यान असलेल्या डांग प्रदेशाचे मुंबई प्रांतात विलीनीकरण करण्यात आले. डांग प्रदेशात १४ छोटी संस्थाने किंवा प्रमुख (Chiefs) असून बहुतांश प्रजा भिल्ल, कोळी, कोकणी वारली अशी होती. या वैशिष्टयामुळे डांग हा स्वतंत्र जिल्हा तयार करण्याचे आदेश भारत सरकारतर्फे देण्यात आले होते. डांग हा आदिवासी बहुल प्रदेश व तेथील लढवय्ये भिल्ल प्रमुखांनीही सामोपचार व सहकार्याचे धोरण स्वीकारुन आपली संस्थाने स्वतंत्र भारतात विलीन केलेली दिसतात.

गुजरात प्रदेशातील १७ पूर्ण न्यायाधिकार असलेली, १२७ काही प्रमाणात न्यायाधिकार असलेली संस्थाने व २७१ न्यायाधिकार नसलेल्या छोटयाा जहागिरी होत्या. भारत सरकारतर्फे संस्थानिकांचा विशेष दर्जा जपला जाईल व संस्थानिकांनी सरकारकडे जमा केलेला पैसा व संपत्ती ही सरकारतर्फे संस्थानातील लोकांसाठीच उपयोगात आणावी असे आश्वासन मिळाल्यानंतर गुजरात प्रदेशातील संस्थानिकांनी मुंबई प्रांतात संस्थाने विलीन केली. याप्रमाणे जून १९४८ मध्ये गुजरात प्रदेशातील संस्थानाचा २७,००० चौरस मैलाचा २६,२४,००० लोकसंख्या असलेला प्रदेश मुंबई प्रांतात विलीन करण्यात आला. मे १९४९ मध्ये बडोदा संस्थान मुंबई इलाख्यात विलीन करण्यात आले. प्रस्तुत विवेचनावरुन व्ही.पी.मेनन व सरदार वल्लभभाई पटेल यांनी घेतलेली आश्वासक भूमिका व संस्थानिकांमध्ये निर्माण केलेला विश्वास,त्याचबरोबर संस्थानिकांनीही देशहिताचा केलेला विचार यामुळेच दख्खन व गुजरात प्रदेशातील संस्थानांचे विलीनीकरण शांततेत पार पडले असा निष्कर्ष काढता येतो.

सरदार पटेलांनी विलीनीकरणाचे मसुदे तयार करुन घेतले आणि त्यांवर त्यांनी निरनिराळ्याा संस्थानांच्या सह्याा घेतल्या. परंतु या संस्थानांचे एकीकरण, लोकशाहीकरण आणि आधुनिकीकरण अजून व्हायचे होते. संघ राज्याशी एकीकरण घडवून आणण्याकरिता लहान संस्थानांनी शेजारच्या प्रांतात विलीन होण्यास त्यांनी उत्तेजन दिले. यांच्या प्रयत्नांना यश येऊन २६६ लहान मोठी संस्थाने शेजारील प्रांतात विलीन करण्यात आली. या एकीकरणाची सुरुवात ओरिसा व छत्तीसगड यातील संस्थाने शेजारील राज्यात विलिन झाली. अशा संस्थानांची संख्या ३९ होती व लोकसंख्या ७० लाख होती आणि क्षेत्रफळ ५६००० चौ.मैल होते. १ जानेवारी १९४८ रोजी ही संस्थाने ओरिसा आणि मध्य प्रांत यांचा एक भाग बनली.संस्थानांच्या विलीनीकरणानंतर संस्थाने जवळच्या प्रांताचा भाग बनविण्याची सरळ सोपी प्रशासकीय पद्धती भारत सरकारने अवलंबिलेली होती असे आढळते.याचप्रकारे पंजाब प्रांतातील लहान संस्थाने, मद्रास प्रांतातील सेंदूर, बाणगंगापल्ली, फडकोष्टी ही संस्थाने पश्चिम बंगालमधील कूचबिहार आणि बनारस, रामपूर आणि टेहरी गहरवाल ही संस्थाने इ.स. १९४८ मध्ये जवळच्या प्रांतात विलीन करण्यात आली. संस्थानातील लोकांना ते ज्या प्रांतात विलीन झाले त्या प्रांताच्या कायदेमंडळाचे प्रतिनिधित्व देण्यात आले.

संस्थानांचे एकीकरण करण्याची दुसरी पध्दती म्हणजे त्यांना केंद्रशासित म्हणून जाहीर करणे. ही पध्दती हिमाचल

प्रदेश, विंध्यप्रदेश, कच्छ बिलासपूर, भोपाळ, त्रिपुरा आणि मणिपुर यांना लागू करण्यात आली. पूर्व पंजाब मधील १०६०० चौरस मैल क्षेत्रफळ असलेली आणि १० लाख लोकसंख्या असलेली २१ संस्थानांचा समावेश हिमाचल प्रदेशात करण्यात आला. १५ एप्रिल १९४८ रोजी या राज्याचे उद्‌घाटन झाले, बुंदेलखंड आणि भागेलखंड यांच्यातील ३५ संस्थानांचे एकत्रीकरण करुन विंध्यप्रदेश बनविण्यात आला. या प्रदेशाची लोकसंख्या ३६ लाख व क्षेत्रफळ २४६०० चौरस मैल होते. विंध्यप्रदेशाचे उद्‌घाटन एप्रिल १९४८ मध्ये करण्यात आले. परंतु १ जानेवारी १९५० रोजी हा प्रदेश भारत सरकारने आपल्या ताब्यात घेतला.यावरुन संस्थानाचा विस्तार, क्षेत्रफळ व भौगोलिक स्थान लक्षात घेऊन त्याप्रमाणे संस्थानांची विलीनीकरणानंतरची स्थिती भारत सरकारने निश्चित केल्याचे दिसून येते.

कच्छचा १७२४९ चौरस मैलांचा आणि ५ लाख लोकसंख्येचा प्रदेश मे १९४८ मध्ये चीफ कमिशनरचा प्रांत बनविण्यात आला. पंजाबमधील बिलासपूरचे संस्थान १२ ऑक्टोबर १९४८ रोजी, भोपाळचे संस्थान ९ जुन १९४९ रोजी व त्रिपुरा संस्थान १५ ऑक्टोबर १९४९ रोजी भारत सरकारने आपल्या हाती घेतले.

त्यानंतरचा भारत सरकारने स्वीकारलेला मार्ग म्हणजे **संस्थानांचे संघटन स्थापन करणे.** हे संघटन भौगोलिक, भाषिक, सामाजिक आणि सांस्कृतिक एकता लक्षात घेऊन करण्यात आले. या धोरणानुसार १५ फेब्रुवारी १९४८ रोजी २२२ संस्थाने असलेला 'काठियावाड संस्थानांचा संघ' स्थापन करण्यात आला. त्यांचा विस्तार २१४५१ चौरस मैल आणि लोकसंख्या ४१ लाख होती. या राज्यसंघात पाच सदस्यांचे कार्यकारी मंडळ राहिल व या मंडळाचा अध्यक्ष या संघाचा राजप्रमुख हा घटनात्मक प्रमुख या नात्याने राज्य करणार होता. १८ मार्च १९४८ रोजी अलवार, भरतपूर इ. संस्थाने मिळून मध्य संस्थानांचा एक संघ निर्माण करण्यात आला. पुढे विंध्यप्रदेश संस्थानांचा एक राज्यसंघ त्याचप्रमाणे ग्वाल्हेर, इंदौर, माळवा किंवा मध्य भारत या संस्थानांचा एक राज्य संघ पतियाळा, नाभा, कपूरथळा इ. मोठमोठी सात संस्थाने मिळून पूर्व पंजाब राज्यसंघ निर्माण करण्यात आला.

राजस्थानचा राज्यसंघ तीन अवस्थांमध्ये निर्माण करण्यात आला. पहिल्या प्रथम मेवाड व इतर नऊ राजपूत संस्थाने मिळून एक राजस्थान राज्यसंघ दिनांक १८ एप्रिल १९४८ रोजी निर्माण करण्यात आला. या राज्यसंघात नंतर जयपूर, जोधपूर, जैसलमेर, बिकानेर या संस्थानांची भर टाकण्यात आली १५ मे १९४९ रोजी मध्यराज्यसंघ हा राजस्थान राज्यसंघात विलीन झाला. त्रावणकोर, कोचीनचा राज्यसंघ १ जुलै १९४९ रोजी निर्माण झाला. संस्थानांचा संघ तयार करुन भारत सरकारने संस्थानांचे अस्तित्व पूर्णपणे नष्ट न करता त्यांचा संघ स्थापन करुन संस्थानिकांचा उचित मान राखलेला दिसतो.

पुढे झालेल्या भाषावर प्रांत रचनेमध्ये संस्थाने त्या त्या प्रांतात विलीन करण्यात आली आणि प्रथमत:च भारताचा कोणताच असा एखादा भाग राहिला नाही, जो एखाद्या राजघराण्याकडून चालविला जात होता. अशाप्रकारे भाषावार प्रांतरचनेनंतर संस्थाने व संस्थानिक यांचे अस्तित्व पूर्णपणे नष्ट झालेले आढळते.

**विलीनीकरणानंतरची संस्थानांची स्थिती**

स्वातंत्र्यापूर्वी संस्थानिकांना वर्षाला २० कोटी रुपये शासनाकडून तनखा म्हणून दिले जात होते. विलीनीकरणानंतर ही रक्कम ५.८ कोटी अशी कमी करण्यात आली.नुकत्याच स्वतंत्र झालेल्या भारताला संस्थानिकांना ब्रिटिश

सरकारप्रमाणे तनखा देणे आर्थिकदृष्टया परवडणारे नव्हते म्हणूनच ही तनख्याची रक्कम कमी केलेली दिसून येते. संस्थानांच्या विलीनीकरणानंतर संस्थानिकांनी त्यांच्या संपत्तीतील काही हिस्सा शासनाला सुपूर्द करावा असे त्यांना सांगण्यात आले. रोख रक्कम व गुंतवणूक मिळून संस्थानिकांनी जवळ जवळ ७० कोटी रक्कम सरकारकडे जमा केले, त्यांच्या वैयक्तिक मालमत्तेवरील त्यांचा अधिकार अबाधित राहावा यासाठी त्यांनी अजून ४.५ कोटी रूपये शासनाकडे जमा केले.

मोठया संस्थानांनी आपला पैसा पुढे संशोधन संस्था, शिक्षण, आरोग्य, समाजसेवा यासारख्या संस्थांच्या उभारणीसाठी खर्च केला. यासाठी त्यांनी संस्था, ट्रस्ट स्थापन केले. उदा . ग्वाल्हेर येथील गंगाप्पली फंड, जम्मू काश्मिर मधील हरीतारा फंड, बिकानेर व हैद्राबाद येथे विविध ट्रस्टची स्थापना करण्यात आली. ब-याच संस्थानिकांनी आपले महाल, दागदागिने, फर्निचर, चित्रे विकून पैसा उभा केला व निरनिराळया उद्योगांची उभारणी केली. तर काही उच्चशिक्षित संस्थानिकांनी मोठया पदाच्या नोक-या स्वीकारल्या.

ब-याच संस्थानिकांनी शासनाचा विशेषनिधी बंद झाल्यानंतर त्यांचे महालांची देखभाल करणे शक्य नसल्यामुळे सरकारी कार्यालये, वस्तुसंग्रहालये करण्यासाठी शासनालाच विकून टाकले. पटियाला, जोधपूर, बिकानेर, रामपूर येथील महाल व राजवाडे वेगवेगळया शिक्षण संस्थांना, वस्तुसंग्रहालय, ग्रंथालयांसाठी देण्यात आली. यामध्ये रामपूर येथील संग्रहालयात पर्शियन हस्तलिखीते व बिकानेर येथे उत्कृष्ट शस्त्रास्त्रांचा संग्रह आहे. इंदौर, प्रतापगड, पालनपूर येथील महाल शासकीय कार्यालयांमध्ये रूपांतरित करण्यात आले .

जयपूर, उदयपूर व जम्मू काश्मिरच्या राजांनी आपले महाल, राजवाडे यांचे रुपांतर हॉटेल्समध्ये केले. जेथे येणारे प्रवासी राजघराण्याच्या सोयीसुविधा ऐषआरामाचा लाभ घेऊ शकत होते. ताज, ओबेरॉय, वेलकमग्रुप अशा व्यावसायिक मान्यवर गटांना ही हॉटेल्स चालवण्यास दिली. अशाप्रकारे संस्थानांच्या विलीनीकरणानंतर संस्थानिकांनी आपल्या चरितार्थासाठी निरनिराळे पर्याय निवडलेले आढळतात. पण हे करत असतांना संस्थानिकांनी आपली प्रतिष्ठाही सांभाळलेली दिसते.

संस्थानांच्या विलीनीकरणानंतर काही संस्थानिकांना शासनातर्फे महत्त्वाच्या पदांवर नेमणूक देण्यात आली. यामध्ये म्हैसूरचे महाराज त्यांच्या राज्याचे काही काळ राज्यपाल व त्यानंतर मद्रास प्रांताचे राज्यपाल झाले.संस्थानांच्या विलीनीकरणानंतर बरेच संस्थानिक राजकारणात उतरले. कॉंग्रेस पक्षानेही त्यांना आपल्या पक्षात प्रवेश दिला. कारण या संस्थानिक राजांची निवडून येण्याची कॉंग्रेसला पक्की खात्री होती. इ.स. १९५१-५२ मध्ये काश्मिरचे राजे करन सिंग, जोधपूरचे महाराज यांनी निवडणूका जिंकल्या व आपल्या प्रदेशात त्यांनी उत्तम काम केले. राजकारणात प्रवेश केल्यामुळे खासदार होऊन आपल्या प्रदेशासाठी पूर्वीप्रमाणेच काम करता येणार असल्यामुळे बरेच संस्थानिकांनी विलीनीकरणानंतर कॉंग्रेस पक्षाचे सभासद होऊन निवडणूकात भाग घेतलेला दिसतो व भारतीय राजकारणातही प्रभावी कामगिरी केलेली दिसून येते.

इ.स.१९६७ नंतर मात्र समाजवादाची संकल्पना पुढे नेण्यासाठी कॉंग्रेसने संस्थानिक आतापर्यंत उपभोगत असलेले खास अधिकार रद्द करण्याचे ठरवले. त्याचप्रमाणे संस्थानिकांना मिळणारा तनखाही बंद करणार असल्याचे जाहीर

केले. या विरुध्द आपले हक्क व अधिकार यांच्या संरक्षणासाठी संस्थानिकांच्या वंशजांनी एकत्र येऊन ऑगस्ट १९६७ मध्ये एक संघटना स्थापन केली. बिकानेरचे महाराज व लोकसभा सदस्य करनसिंग यांनी संसदेतही संस्थानिकांचा प्रश्न हिरिरीने मांडला. परंतु डिसेंबर १९७२ मध्ये कॉंग्रेस सरकारतर्फे संस्थानिकांसंदर्भातील प्रस्ताव दोन्ही सभागृहात पास झाला आणि संस्थानिकांना मिळत असलेला विशेष दर्जा, अधिकार रद्द झाला. भारतातील संस्थानिकांच्या दृष्टिने संस्थानाचे विलीनीकरण ही अत्यंत दु:खदायक घटना होती. परंतु या सर्व संस्थानिकांनी देशाच्या आपल्या प्रजेच्या हिताचा विचार करुन लोकशाहीला प्राधान्य दिल्याचे आढळून येते. आजही भारतातील बऱ्याच संस्थानिक घराण्यातील वंशजांनी उद्योग समाजकारण राजकारण यात भाग घेऊन आपल्या घराण्याची परंपरा व मान जपलेला दिसतो.

**निष्कर्ष :-**

१. भारताला जेव्हा स्वातंत्र्य देण्याची वेळ आली त्यावेळी ब्रिटिश अधिकाऱ्यांनी आपले फोडा व झोडा हे राजकारण वापरून संस्थानिकांच्या भारतात स्वतंत्र राहण्याच्या विचाराला पाठिंबा देऊन विलीनीकरणाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

२. याचाच फायदा घेऊन बॅ. जीनांनी बऱ्याच संस्थानिकांना पाकिस्तानात सामील होण्याचे निमंत्रण दिले होते. त्यामुळे विलीनीकरणाचा प्रश्न बिकट बनला होता. त्यामुळेच तत्कालीन विद्वानांना भारताच्या फाळणीपेक्षा संस्थानाच्या विलिनीकरणाचा मुद्दा जास्त महत्त्वाचा वाटत होता.

३. संस्थानांचे विलीनीकरण हे संस्थानिकांच्या दृष्टीने एक दु:खद घटना होती. पण देशहिताचा विचार करून त्यांनी विलीनीकरणास आनंदाने मान्यता दिल्यामुळेच पुढे ही प्रक्रिया शांततेत पार पडू शकली. म्हणूनच संस्थानाचे विलीनीकरणाचे श्रेय जसे सरदार पटेलांना दिले जाते तसेच श्रेय संस्थानिकांनाही देणे आवश्यक ठरते.

४. विलीनीकरणानंतरही संस्थानिकांनी आपल्या प्रजेशी जिव्हाळयाचे संबंध ठेवलेले दिसतात. आपले महाल, वाडे, व पैसा यांचा उपयोग आपल्या प्रजेसाठीच व्हावा यासाठी ते आग्रही होते. यातून संस्थानिकांचा उदारपणा, प्रजेसाठी कळकळ, जनहिताची भावना लक्षात येते. त्यामुळे भारतात आजही काही संस्थानिक घराण्यांना आदराचे स्थान आहे.

**संदर्भ :-**

Kulkarni V.B., (1985), Princely India https://www.thebetterindia.com/124500/sardar-patel-vp-menon-integration-princely-states-india-independence

महाजन विद्याधर (२००१), आधुनिक भारत का इतिहास, ऐस, चन्द अ‍ॅड कंपनी लि. रामनगर न्यू दिल्ली, पृ.क्र. ७१०.

Kulkarni V.B. (1985), Princely India and Lapse of British Paramountcy, Published by Ashwin Shah, Jaico Publishing House, 121 Mahatma Gandhi Road, Bombay, Page No. .216.

कित्ता - Page No.219

कित्ता - Page No.223.

Palekar S.A., (2008), Sardar Vallabhabhai Patel and National Integration, Published by Serials Publications 4830/24, Prahlad Street, Ansari Road, Darya Ganj, New Delhi, Page No. 57.

Menon V.P. , (March 1956), The Story of the Integration of the Indian States, Published in America by The Macmillan Company New York, Printed in India by V.N. Bhattacharya M.A.at the Inland Printed works 60/3 Dharamtala street, Calcutta-13. Page No. 203.

कित्ता - Page No.204, 205.

Kulkarni V.B., (1985), Princely India and Lapse of British Paramountcy, Published by Ashwin Shah, Jaico Publishing House,121 Mahatma Gandhi Road, Bombay, Page No. 230

डॉ.कोलारकर श.गो. (२००४),आधुनिक भारत १७६० ते १९५०, श्री. मंगेश प्रकशन, श्री. शांतादुर्गा निवास, २३ फार्मलॅड, नवी रामदास पेठ ,नागपूर, पृ. क्र. ४२३

कित्ता - पृ.क्र. ४२४.

Dwivedi Sharda, (2007), The Maharaja and the Princely States of India, Published in India by Roli Books in arrangement with Roli and Janssen BV, The Netherlands M-75, Greater Kailash II Market, New Delhi, India, printed and bound at Star Standard Industries Pvt. Ltd, Singapore, Page No.34, 35.

Kulkarni V.B., (1985), Princely India and Lapse of British Paramountcy, Published by Ashwin Shah, Jaico Publishing House, 121 Mahatma Gandhi Road, Bombay, Page No.236.

***Cite This Article:***

**डॉ. शितल मनोज पंचीकर,** *(2022)*.**भारतातील संस्थानांचे स्वतंत्र भारतात विलनीकरण व त्यानंतरची परिस्थिती : एक अवलोकन,** *Educreator Research Journal IX (II) Mar-April, 101-108.*